नि.फौ.ख.क्र. १५८/२०२०
सरकार वि. निर्मला
नि.क्र. २०

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ यांची जबानी.</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव – दिलीप लक्ष्मणराव खाडे
वय – ५५ वर्षे,धंदा – असीस्टंट डायरेक्टर पोस्ट विभाग नागपुर
राहणार – नागपुर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.संदेश काठोके –**

घटना ही सन २०२० ची आहे. घटनेच्यावेळी Assistant Superintendent या पदावर पवनी सब डिवीजन मध्ये काम करत होतो. तेव्हा माझ्याकडे बामनी ब्रांच ऑफीस होते. त्या ठिकाणी निर्मला नन्नावरे या ब्रांच पोस्ट मास्टर म्हणून कार्यरत होत्या. तेव्हा त्यांनी डिपॉझीटरचे पैसे व पासबुक घेतले, आरडी, एसबी, सुकन्या समृध्दी योजना यांचे पासबुक घेतले व पैसे घेतले. त्या पासबुकमध्ये पोस्ट ऑफीसचा स्टँप मारला, तेथे सही केली. परंतु, ते घेतलेले पैसे आमच्या ब्रांच पोस्ट ऑफीसच्या अकाउंटमध्ये जमा केले नाही. अशा प्रकारे त्यांनी अफरातफर केली. लोकांच्या तक्रारी आल्या होत्या. त्यावरुन आम्ही चौकशी केली.

२. मी व निखार यांनी चौकशी केली. ती रक्कम पन्नास हजाराच्या वर असल्यामुळे आमच्या कार्यालयाच्या नियमाप्रमाणे फिर्याद दाखल करणे बंधनकारक होते. म्हणून मी उमरेड पोलीस स्टेशनला तक्रार दिली. मी लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलीसांनी माझे बयान घेतले.

आता मला फिर्याद  दाखविली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २१** देण्यात येते. आता मला प्रथम छापील खबर  दाखविली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २२** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री रघुते यांच्यातर्फे  सुरु.**

३.  आरोपी किती वर्षापासुन नोकरीला होत्या हे मी सांगु शकत  नाही. पण मी आलो त्यावेळी त्या काम करत होत्या. त्यांचे काम दैनंदिन सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, या पुर्वी आरोपीबद्दल आमच्या ऑफीसला कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांची प्रतिमा चांगली होती. मी आरोपी बामनी पी.ओ. येथे कार्यरत होती, याबाबतचे दस्तावेज तपासी अधिकारी यांना दिले नाही. मी तक्रार देतांना असे नमुद केले होते की, डिपॉझीटरचे पैसे व पासबुक घेतले, आरडी, एसबी, सुकन्या समृध्दी योजना यांचे पासबुक घेतले व पैसे घेतले. सदरची बाब माझ्या फिर्यादमध्ये नमुद नाही, ती का नमुद नाही, याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने एसबी, आरडी व सुकन्या समृध्दीचे पैसे घेतले नाही, म्हणून ते फिर्याद मध्ये नमुद नाही.

४.  हे म्हणणे खरे आहे की,  मी व निखार यांनी चौकशी केली, ती रक्कम पन्नास हजाराच्या वर असल्यामुळे आमच्या कार्यालयाच्या नियमाप्रमाणे फिर्याद दाखल करणे बंधनकारक होते, ही बाब मी फिर्याद मध्ये नमुद केली नाही. घटना ही सन २०१८ ची असेल. हे म्हणणे खरे आहे की, मी दोन वर्षानंतर तक्रार दाखल केली. ऊशीराने फिर्याद दिली याचे कारण आम्ही फिर्याद मध्ये नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, चौकशी साठी वरीष्ठांच्या आदेशाची मला आवश्यकता असते. मी चौकशी अहवाल पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो चौकशी अहवाल अभिलेखावर

दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, चौकशी केली नाही म्हणून अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने डिपॉझीटरचे पैसे घेतले हे मी स्वतःहुन सांगत आहे, ते मी माझ्या मनाने सांगत आहे.

५.

हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

**समक्ष,**

श्रवणोत्तर स्विकृत,

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : २३.०४.२०२६

न्यायदंडाधिकरी प्रथम वर्ग,
उमरेड